| NSE's subsidiary launched online C-KYC registry | |
| --- | --- |
| **Source:** Loksatta | **Date:** 4 August 2016 |

# एनएसईची उपकंपनी ऑनलाइन 'सी-केवायसी'ची नोंदणी करणार

**व्यापार प्रतिनिधी, मुंबई**

**कोणत्याही वित्तीय** सेवेचे ग्राहक/ गुंतवणूकदारांना अत्यावश्यक असलेल्या 'तुमच्या ग्राहकांना जाणा (नो युअर कस्टमर्स- केवायसी)' या ग्राहकांची ओळख व सत्यता पटवणाऱ्या प्रक्रियेचे सुलभीकरणासाठी आणखी एक पाऊल सरकारने टाकले आहे. गुंतवणूकदारांना आता सामाईक स्वरूपात, एकदाच केवायसीची प्रक्रिया करावी लागेल अशा 'सेंट्रल - केवायसी' (सी-केवायसी) अर्थात मध्यवर्ती केवायसी नोंदींची योजना सरकारने बनविली आहे.

भारत सरकारचा उपक्रम असलेल्या 'सेंट्रल रजिस्ट्री ऑफ सिक्युराटायझेशन अॅसेट रिकन्स्ट्रक्शन अॅण्ड सिक्युरिटी इंटरेस्ट ऑफ इंडिया (सीईआरएसएआय)' या संस्थेला सी-केवायसी नोंदींचे जतन करण्याची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. तर राष्ट्रीय शेअर बाजार (एनएसई)ची उपकंपनी असलेल्या डॉटेक्स इंटरनॅशनल लिमिटेड ही सी-केवायसीची प्रत्यक्ष प्रक्रिया पार पाडण्यासह या प्रक्रियेसंबंधी 'हेल्प डेस्क' अर्थात मदत-मार्गदर्शनाचे कामही करणार आहे. सी-केवायसी पद्धती अस्तित्वात आल्यावर, गुंतवणूकदारांना कोणत्याही वित्तीय सेवा संस्थेकडे जसे बँक, म्युच्युअल फंड, विमा कंपनी, नवीन पेन्शन प्रणाली (एनपीएस), डिमॅट अथवा ब्रोकिंग खाते यापैकी कोणत्याही एका ठिकाणी जरी केली असेल तरी ते सर्वच वित्तीय उत्पादनांना लागू ठरेल. मध्यवर्ती नोंदी असल्याने, नाव अथवा पत्त्यातील बदलासारख्या दुरुस्त्याही केवळ एकाच ठिकाणी केल्या गेल्यास, त्या अन्य सर्वत्र अद्ययावत होतील.

चालू वर्षाच्या अर्थसंकल्पात या महत्त्वाकांक्षी योजनेची घोषणा केली गेली होती, असे नमूद करून केंद्रीय अर्थमंत्रालयातील वित्तीय सेवा विभागाचे उपसचिव मोहम्मद मुस्तफा यांनी सी-केवायसी हे वित्तीय संस्था आणि त्यांच्या ग्राहकवर्गासाठी एक अत्यंत महत्त्वाचे व सोयीस्कर पाऊल असल्याचे मत व्यक्त केले. यातून ग्राहकांचा मनस्ताप कमी होईल आणि वित्तीय संस्थांच्या खर्चात लक्षणीय बचत होईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.